मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# जनसेवेचा वसा आणि विकासाचे व्हिजन: पुनावळे-ताथवडेच्या परिवर्तनासाठी सुमन नवनाथ ढवळे सज्ज!

**विकसनशील प्रभाग : 25**

पिंपरी | प्रतिनीधी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग २५ (पुनावळे-ताथवडे) भागाचा झपाट्याने विस्तार होत असताना, या भागाला एका संवेदनशील आणि अनुभवी नेतृत्वाची गरज आहे. २००७ पासून सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या आणि २०१४ पासून स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात पाऊल ठेवणाऱ्या सुमनताई नवनाथ ढवळे यांनी आज आपल्या कामाने जनमानसात अढळ स्थान निर्माण केले आहे.






## शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान

केवळ राजकारण नाही, तर समाजाच्या बौद्धिक विकासासाठीही त्या कार्यरत आहेत. अधिरा इंटरनॅशनल स्कूल' च्या माध्यमातून त्यांनी दर्जेदार शिक्षण देण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा ही त्यांची प्राथमिकता राहिली आहे.

## जनसंपर्क आणि पारदर्शकता

नुकतेच त्यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले. विशेष म्हणजे, हे उद्घाटन कोणत्याही मंत्र्यांच्या हस्ते नव्हे, तर परिसरातील ५० हून अधिक सोसायट्यांच्या सभासदांच्या हस्ते करण्यात आले. हे त्यांच्यावरील लोकांच्या प्रेमाचे आणि विश्वासाचे जिवंत उदाहरण आहे.



## पद नसतानाही कामाचा धडाका: 'व्हिजन' प्रभाग २५

आज कोणतेही अधिकृत पद हाती नसताना सुमनताई आणि नवनाथभाऊ यांनी अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत:
वाहतूक कोंडीवर उपाय: अंडर बायपास येथील वाहतूक सुरळीत करण्यासाठी १० वाहतूक रक्षक स्वखर्चाने तैनात केले आहेत.
प्रदूषण नियंत्रण: बांधकामांमुळे उडणारी धूळ आणि नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन दोन पाण्याचे टँकर रस्ते ओले करण्यासाठी कार्यान्वित केले आहेत.
नियोजित प्रकल्प: या भागात ५४ एकरच्या जागेवर भव्य 'ऑक्सिजन पार्क' उभारण्याचा त्यांचा मानस आहे, जेणेकरून भविष्यातील पिढीला शुद्ध हवा मिळेल.

## भविष्यातील संकल्प

आरोग्य, शिक्षण, क्रीडा आणि महिला सबलीकरण या चतुःसूत्रीवर सुमनताईंचा भर आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे त्यांचे ध्येय आहे. अंडर बायपासच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत.

> "आम्ही शब्दांपेक्षा कृतीवर विश्वास ठेवतो. आजवर ज्या ताकदीने डम्पिंग ग्राऊंडचा लढा जिंकला, त्याच ताकदीने प्रभाग २५ चा सर्वांगीण विकास करायचा आहे. मतदारांनी संधी दिल्यास त्या संधीचे सोने करून आदर्श प्रभाग घडवू!"
>
> - सुमन नवनाथ ढवळे
> डायरेक्टर, अधिरा इंटरनॅशनल स्कूल











